# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०–२५६३०२३५
ई–मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

(45)

कार्यालयीन परिपत्रक क्र. ९६९

जा.क्र. झोपुप्रा/ताबा/परिपत्रक/ ९५८ /२०१५
दिनांक :२६/०५/ २०१५.

**विषय** :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत परिशिष्ट-२ मधील पात्र झोपडीधारक मयत झाल्यास त्यांचे कायदेशिर वारसांबाबत...

संदर्भ :- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. पुणे यांनी मान्य केलेली दि.२०/०५/२०१५ रोजीची टिपणी

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या कार्यालयामार्फत विविध विभागांद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विविध टप्प्यांवर कार्यवाही केली जाते. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतींचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर सदनिकांचे वाटप लॉटरी पध्दतीने करून सदनिकांचे निश्चितीकरण करण्याबाबतची कार्यवाही ताबा विभागामार्फत करण्यात येते. तथापि, सदनिकांचा ताबा देण्यापूर्वी अनेकदा पात्र झोपडीधारक मयत झालेले असतात. अशा प्रकरणी संबंधित पात्र झोपडीधारकांचे वारसांकडून वारसाहक्क सिध्द करण्यासाठी सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेऊन त्या वारसाचे नावे सदनिकाचे हस्तांतरण करारनामा करण्यात येतो. तसेच सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र सादर करणे हे खर्चिक व वेळखाऊ असल्याने त्यासाठी झोपडीधारकास मोठया प्रमाणात कोर्ट फी भरावी लागते. तसेच Succession Certificate हे मयात व्यक्तीच्या जंगम मालमत्तेबाबत दिले जाते. तर Heirship Certificate द्वारे मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस किती आहेत, हे निश्चित होते. या कार्यालयामध्ये मयत वारसांच्या प्रश्नांबाबत अनेक प्रकरणे प्राप्त होत आहेत. सबब, उपरोक्त वस्तुस्थिती पाहता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या कार्यालयामार्फत खालीलप्रमाणे मयत वारसांच्या संदर्भात कार्यपध्दती निश्चित करणेत येत आहे.

**इमारतीचे बांधकाम झालेनंतर सदनिकांचे लॉटरी पध्दतीने वाटप करण्यापूर्वी विकसकाकडून तसेच पात्र झोपडीधारकांकडून विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील मयत पात्र झोपडीधारकांची यादी प्राप्त करून घेण्यात यावी.**

१) सदरहू यादी प्राप्त करून घेतलेनंतर मयत पात्र झोपडीधारकांचे वारसासंदर्भात योजनास्थळी नोटीसीद्वारे अर्ज करण्याबाबत कळविण्यात यावे. या करीता अर्जदारास १५ दिवसांचा कालावधी देण्यात यावा.

२) १५ दिवसानंतर या कार्यालयाकडे अर्ज प्राप्त झाल्यानुसार संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्याकडे केवळ योजनाक्षेत्रातील वारसांच्या नोंदीबाबत सुनावणी घेण्यात यावी.

३) सदर सुनावणीमध्ये सदनिकांचा ताबा देण्याबाबत वारसांमध्ये एकमत झाल्यास सर्व कायदेशीर वारसांकडून सदनिकेचा ताबा निश्चित करण्याबाबत व पुन्हा हरकत न घेण्याबाबत प्रतिज्ञपत्र व बंधपत्र तयार करून घेण्यात यावे.

४) जर कायदेशीर वारसांमध्ये सदनिकेचा ताबा मिळणेबाबत काही मतभेद असल्यास त्या प्रकरणी सक्षम न्यायालयाकडून Heirship Certificate सादर करणेबाबत कळविणेत यावे.

५) सुनावणीमधे वारसांबाबत निर्णय झालेनंतर जाहीर प्रकटन देण्यात यावे. तद्नंतर १५ दिवसांची मुदतीत कोणीही आक्षेप न घेतल्यास वारसाचे नाव निश्चित करण्यात यावे.

६) अशा प्रकारे सर्व प्रकरणांत निर्णय झालेनंतरच विकसकास सदनिकांचा हस्तांतरण करारनामा करणेबाबत या कार्यालयाकडून परवानगी देण्यात यावी.

७) जर पात्र झोपडीधारकाने मृत्युपूर्वी इच्छापत्र (Will) केले असेल तर मृत्युपत्र खरे असल्याबाबतची खातरजमा सक्षम प्राधिकारी यांनी मूळ कागदपत्र घेऊन संबंधित केवळ योजनाक्षेत्रातील कायदेशिर वारसाबाबत निर्णय घेण्यात यावे.

८) जर एखाद्या प्रकरणी आक्षेप घेतल्यास Heirship Certificate वारस प्रमाणपत्र घेण्यात यावे.

९) सर्व प्रकरणांत कायदेशिर वारस निश्चित झालेनंतर शासन निर्णय ११/०९/२०१४ रोजी नियमावलीनुसार वारस अर्जदाराकडून विहीत नमून्यात १०० रू.च्या स्टॅम्पपेपरवर शपथपत्र घेण्यात यावे. तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत एकदा सदनिकेचा लाभ मिळाला असल्यास त्या व्यक्तिस जरी वारस ठरला तरी सदनिकेचा दुबार लाभ दिला जाणार नाही.

१०) सदनिकांचे पात्र झोपडीधारकांना हस्तांतरण झालेनंतर त्यांच्या वारसांना सभासद करुन घेणेची कार्यवाही संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थेने करावी. सदरची कार्यवाही विहीत मुदतीत करणेत यावी.

458

१९) सदनिकांचे हस्तांतरण करारनामा झालेनंतर १० वर्षाच्या मुदतीत पात्र झोपडीधारक मयत झाल्यास कायदेशिर वारसांबाबत काही वाद निर्माण झाल्यास न्यायालयाकडून ठराव (Declaration) घ्यावे. त्याबाबत झो.पु.प्रा.ची जबाबदारी राहणार नाही.

वरील परिपत्रकीय सूचनेची अंमलबजावणी संबंधित विभागाने तात्काळ करावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :-

१ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.प्र.प्रा., पुणे
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा.,पुणे.
३. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकरी, झो.पु.प्रा. पुणे
४. सहाय्यक संचालक, नगर रचना, झो.पु.प्रा.,पुणे
५. नगर रचनाकार, झो.पु.प्रा. पुणे
६. तहसिलदार, (श्रीमती. वाघमारे/ श्रीमती. गायकवाड/ श्रीमती. बारटक्के)
७. उप अभियंता. (श्री. रणझुंझे/ श्री. शिंत्रे/ श्रीमती. वाणी)
८. शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता. (श्री. पिंपळखुंटे/ श्री. नाईक/ श्री. जतकर)